


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार ८ मे २०२५ | अंक १४७ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# शरद पवारांकडून पहिल्यांदाच मोदींच्या नेतृत्वाचं कौतुक, भारताने पाकला धडा शिकवला



पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात निष्पाण पर्यटकांचा बळी गेला. या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेत भारताने चोख प्रत्युत्तर दिलं. काल मध्यरात्री 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत भारताने काल मध्यरात्री 1.30च्या सुमारास पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानात मिसाइल हल्ला केला. त्यामध्ये जवळपास 9 दहशतवादी अड्डे उद्धस्त झाले आणि 100 हून अधिक दहशतवादी मारले गेले. भारताच्या या कारवाईचे देशभरातून कौतुक होत असून पहलगामचा बदला घेण्यात आल्यामुळे समाधान व्यक्त होत आहे. सामान्य नागरिकांप्रमाणेच देशातील अनेक राजकीय नेत्यांनीही या कारवाईचे कौतुक केले असून देशातील ज्येष्ठ नेते, राजकारणी, राष्ट्रवादी काँग्रेचे प्रमुख शरद पवार यांनीही प्रतिक्रिया दिली. आज सकाळीच त्यांनी ट्वीट करत भारतीय सैन्य दलाचे कौतुक केले होते. त्यानंतर काही वेळापूर्वीच त्यांनी माध्यमांशी संवाद साधत ऑपरेशन सिंदूरवर सविस्तर प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी पहिल्यांदाच पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाचं कौतुकही केलं. भारतीय नेतृत्व आणि भारतीय सेना यांच्यामध्ये कोणतंही अंतर नाही हे जगाला कळलं. आज सगळा देश AIR फोर्सच्या पाठीमागे आहे, अशी आमची भूमिका आहे, असं पवार यांनी स्पष्ट केलं. दहशतवाद्यांच्या हल्ल्यात निष्पाप बहिणीचे कुंकू पुसलं गेलं होतं, त्यामुळे भारत सरकारने दहशतवाद्यांवर केलेल्या कारवाईला दिलेलं 'ऑपरेशन सिंदूर' हे नाव अतिशय योग्य असल्याचेही शरद पवार म्हणाले. आज संपूर्ण देश सेनेच्या पाठिशी ठामपणे उभा गेल्या काही आठवड्यात देशात जे घडलं त्यामुळे लोकांमध्ये प्रचंड अस्वस्थता होती. लोकं पलीकडून येतात, हल्ला करतात. पण यामध्ये सरकारला कुठलीही बघ्याची भूमिका घेता येत नाही. जो काश्मीरचा भाग पाकिस्तान घेतला (पाकव्याप्त काश्मीर) तिथं हल्ला केला आहे. या ठिकाणी दहशतवाद्यांचे कॅम्प आहेत, तिथं दारूगोळा ठेवला जातो. पाकिस्तानची बॉर्डर आपण ओलांडून गेलो नाही ती काळजी हवाई दलाने घेतली. काश्मीरमध्ये जे काही झालं त्यांनतर देशातील काही लोकांच्या मनात काश्मिरी लोकांबाबत शंका होती. जम्मू काश्मीर विधानसभेत अधिवेशन घेऊन या हल्ल्याचा निषेध केला गेला. मुख्यमंत्री यांनी भाषणात त्यांनी स्वच्छ भूमिका घेतली . भारतीय नेतृत्व आणि भारतीय सेना यांच्यामध्ये कोणतंही अंतर नाही हे जगाला कळलं आहे, असं शरद पवार म्हणाले. आंतरराष्ट्रीय राजकारणात भारत आक्रमक अशी प्रतिमा जाऊ नये. आज सगळा देश AIR फोर्स च्या पाठीमागे आहे, अशी आमची भूमिका असल्यातंही शरद पवार यांनी स्पष्ट केलं. सतर्क राहण्याची गरज आहे भारतात दहशतवादी हल्ला झाला, त्यानंतर भारताने कारवाई करून दहशतवाद्यांचे तळ उद्धस्त करत प्रत्युत्तर दिले. हल्लाच्या या ॲक्शननंतर अमेरिका, जपान या देशांनी भारताला समर्थन दिले आहे. मात्र चीनने समर्थन दिलं नाही ही काळजी करण्यासारखी गष्ट असल्याचे पवार म्हणाले. युद्ध होईल की नाही आज सांगणं योग्य नाही मात्र सतर्क राहण्याची गरज असल्याचा इशाराही त्यांनी दिला. पाकिस्तानला त्यांची आणि भारताची ताकत माहित आहे त्यामुळे आपल्याला सतर्क राहावं लागेल. आर्थिक कोंडी कशी करता येईल या दृष्टीने पाऊल टाकली पाहिजेत, असेही ते म्हणाले. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात अनेक पर्टक मारले गेले. त्यात अनेक निष्पाप बहिणींचे कुंकू पुसलं गेलं. त्यामुळे भारताने कालची कारवाई करताना त्याला ऑपरेशन सिंदूर हे जे नाव दिलं ते योग्य आहे, असं मतही शरद पवार यांनी व्यक्त केलं. अशावेळी संकुचित वृत्ती ठेवणं योग्य नाही. आज आपण एकत्र राहूया असे आवाहनही त्यांनी केलं. जो काही संयम ठेवायला पाहिजे तो इंडियन एअर फोर्सने ठेवायला आहे. भारताची भूमिका आक्रमक नव्हती. आता संबंध देशाने सावध राहून सरकारला सहकार्य कराव लागेल, असं पवार म्हणाले.

# मनोज जरांगेंमुळे मराठा समाजाचं मोठं नुकसान, छगन भुजबळांनी पुन्हा काढले अस्त्र, त्या वक्तव्याने आता वाद पेटणार

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि छगन भुजबळ यांच्यातील वाकयुद्धाची ठिणगी पडली आहे. छगन भुजबळ यांनी पहिली तोफ डागली आहे. भुजबळ यांच्या वक्तव्याने वाद रंगण्याची शक्यता आहे. भुजबळ यांनी मनोज जरांगे यांच्यावर चांगलेच तोंडसुख घेतले आहे. जरांगे पाटील यांचा चलो मुंबईचा पवित्रा आणि भुजबळांची जरांगेंच्या आंदोलनावरची टीका यांचा जणू योग्य जुळून आला आहे. त्यामुळे पुन्हा वाद पेटण्याची शक्यता आहे. आरक्षण पुन्हा बहाल माझी नाराजी त्या ठिकाणी आहे. ओबीसी आणि सभागृहावरील संकट दूर झालेलं आहे. आमचं आरक्षण आम्हाला पुन्हा बहाल केलं गेलं आहे. आठ कोटी जनतेचा आनंदाचा क्षण आहे कारण सुप्रीम कोर्टाने आमचं आरक्षण आम्हाला दिलंय, अशी प्रतिक्रिया भुजबळांनी दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने आनंदसर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने आनंद झाल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली. कोणीही नाराज होण्याची गरज नाही. आमचं आरक्षण 1994-1995 पासून मिळालेलं आहे. यामध्ये काही लोकांनी फांद्या मारून कोर्टात जाऊन अडचणी निर्माण केल्या. त्यामुळे आमचं आरक्षण खाली वर होत होतं. सुप्रीम कोर्टाने जो




निकाल दिलाय त्यावर कोणीही नाराज होण्याचं कारण नाही. हा क्षण आनंदाचा असल्याचे ते म्हणाले. मराठा समाज आरक्षण मराठा आरक्षणाविषयी त्यांनी बोलकी प्रतिक्रिया दिली. जे झालंय जे होतंय ते तुमच्या समोर आहे. जे नवीन नेते उभे राहिलेत ते काही निर्णय घेताय. अनेकवेळा अभ्यासही नसतो आरक्षण कशाला म्हणतात ते का द्यायचं आहे, कसं द्यायचं आहे , सुप्रीम कोर्ट आणि आयोगाचे निर्णय काय आहे, महाराष्ट्राची सामाजिक परिस्थिती काय आहे याचा अभ्यास ज्यांना आहे ते नाराज होत नाही. ज्यांचा अभ्यास नाही त्यांना काय वाटतं त्याची पर्वा करण्याचं काही कारण नाही, असा टोला छगन भुजबळांनी लगावला.

## शिवारती राठोड ८१ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड-किनवट : इयत्ता बारावी बोर्डाचा निकाल जाहीर झाला असून सरस्वती विद्यामंदिर कनिष्ठ विद्यालयाने आपली उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.या विद्यालयातील विज्ञान शाखेचा ९८ टक्के निकाल लागला असून ह्याच विद्यालयातील विद्यार्थिनी कु. शिवारती रमेश राठोड हिने उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत इयत्ता १२ वी विज्ञान शाखेमध्ये ८१ टक्के गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे.तिने १२ वी मध्ये ६०० पैकी ४८८ गुण मिळविले आहेत.इंग्रजी विषयात ८५ फिजिक्स ८३ केमिस्ट्री-८६ बायोलॉजी- ६७ क्रॉप सायन्स १६७ गुण मिळाले आहेत. त्याबद्दल शिवारतीचे सर्वत्र कौतुक होत आहे. शिवारतीच्या यशाबद्दल आई सविता राठोड वडील रमेश राठोड मुख्याध्यापक कृष्णकुमार नेम्मानिवार यांच्यासह शाळेतील शिक्षक नातेवाईक यांनी शुभेच्छा देऊन कौतुक केले.तसेच सर्व स्तरांमधून तिचे अभिनंदन होत आहे.

# २९ गिर जातीच्या गायी मृत्यूमुखी पडल्या

धारुर (बीड): किल्लेधारूर येथील कामधेनू गोपीनाथ मुंडे गोशाळा पुन्हा एकदा चर्चेत आली आहे, पण यावेळी एका दुःखद घटनेमुळे. प्रसिद्ध प्रगत शेतकरी ठाकुर उदयसिंह दिख्खत यांच्या या गोशाळेत दहा दिवसांपूर्वी अचानक 29 गिर जातीच्या गायी मृत्यूमुखी पडल्या, त्यामुळे स्थानिक शेतकरी आणि पशुपालकांमध्ये मोठी खळबळ माजली आहे. गायींच्या मृत्यूचं कारण प्रथमदर्शनी समजले नाही, मात्र आता परभणीहून आणलेल्या तुरीच्या भुस्कटामुळे विषबाधा झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. उदयसिंह ठाकुर यांची ही गोशाळा तांदुळवाडी



शिवारात गेली आठ वर्षे यशस्वीपणे चालू आहे. त्याठिकाणी देशी, गावरान, गिर, कंधार-देवणी अशा विविध जातींच्या सुमारे 125 गायींचं संगोपन केलं जातं. ही गोशाळा केवळ व्यवसाय नसून पुण्यकर्म मानून चालवली जाते. विशेष म्हणजे शासकीय अनुदानाचा एक रुपयाही त्यांनी कधी स्वीकारलेला नाही. अद्ययावत शेड, चारा-पाण्याची सोय आणि स्वच्छतेकडे काटेकोर लक्ष देणारी ही गोशाळा पाहण्यासाठी दूरदूरवरून लोक येत असतात. घटनेच्या काही दिवस आधीच, चाऱ्यासाठी परभणी येथून तुरीचे भुस्कट खरेदी करून आणण्यात आले होते. त्यानंतर सलग काही दिवसांत एकाच दिवसात 6 अशा प्रमाणात एकूण 29 गायींचा मृत्यू झाल्याचे ठाकुर यांनी सांगितले.पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत मृत गायींचं पोस्टमार्टम केलं, परंतु तात्काळ काही निष्पन्न झालं नाही. मात्र, वैद्यकीय अहवालानंतर हे स्पष्ट झालं की तुरीवर फवारण्यात आलेल्या रसायनांमुळे गायींना विषबाधा झाली आणि त्यांच्या मृत्यूला कारणीभूत ठरली. या घटनेची माहिती मिळताच पशुवैद्यकीय आयुक्त डॉ. विजय कराड यांनी तात्काळ लक्ष घालून विशेष पथक गोशाळेकडे पाठवलं. त्यांच्या वेळीच हस्तक्षेपामुळे आणखी गायींचा जीव वाचवण्यात यश मिळालं, अशी चर्चा गावात सुरू आहे. मृत गायींच्या अंत्यविधीसाठी धार्मिक विधीनुसार शेतातच दफनविधी करण्यात आले. एकीकडे या घटनेने शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.

# जवाहर उल उलूम उर्दू महाविद्यालयाची गुणवत्तापूर्ण निकालाची परंपरा कायम

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाटनांदेड : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी - मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच राज्य शिक्षण मंडळाकडून ऑनलाईन जाहीर करण्यात आला. यामध्ये जवाहर उल उलूम उर्दू महाविद्यालय किनवट ने याही वर्षी आपल्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखत शैक्षणिक आलेख उंचावत ठेवला आहे. महाविद्यालयाच्या २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात कला शाखेतुन एकुण ४२ विद्यार्थी हे परीक्षेस प्रविष्ट होते पैकी ४० विद्यार्थी हे उत्तीर्ण झाले.९५.२३ टक्के निकाल हा कला शाखेचा लागला.यामध्ये प्रथम श्रेणीत ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कला शाखेतुन सर्वाधिक ७५.३३ गुण घेवून कु.मलेका शहाबोद्दीन चव्हाण प्रथम,कु.रुमाना महेरीन अब्दुल रफिक ७२.८३ गुण घेऊन व्दितीय,सानिया शेख रईसोद्दीन ७२.१७ गुण घेवून तृतीय क्रमांक पटकावला आहे.तर सुमेरा शेख नईम ७१ तुबा शेख शफी ७०.६७ सदफ अलमास सत्तार खिच्ची ६७ घेऊन उत्तीर्ण झाली.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ईसा खान सरदार खान, मुख्याध्यापिका असमा खातून व महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकरी पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार व दडपशाहीमुळे आक्रमक ; जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक यांना लेखी तक्रार :- डॉ.गणेश ढवळे

पाटोदा:- ( दि.०७ ) पाटोदा तालुक्यात पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार, शेतकऱ्यांना मावेजा न देणे, एकसारखा मावेजा न देणे, धनादेश न वटणे आणि पुन्हा वरून पोलिस प्रशासनाच्या मदतीने दडपशाही करणे असे प्रकार सर्रास सुरु असुन आज दि.७ बुधवार रोजी पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकरी पवनचक्की कंपन्यांच्या विरोधात आक्रमक झाले होते. शेतकऱ्यांचा विरोध झुगारून पोलिस बंदोबस्तात शेतकऱ्यांच्या शेतातुन विद्युत तारा ओढणा-या पवनचक्की कंपन्यांना विरोध केल्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण होते. पाटोदा पोलिस स्टेशन पोलिस उपनिरीक्षक आदिनाथ भडके व पोलीस प्रशासन आणि अतिरीक्त कुमक व दोन पोलिसांच्या व्हॅन घटनास्थळी दाखल होत्या. तारा ओढण्यास विरोध करणाऱ्या व जबरदस्तीने तारा ओढल्यास जीवाचे बरं वाईट करून घेईन असं म्हणणा-या अक्षय बाळासाहेब मुळे या शेतकरी पुत्राला पोलिसांनी पकडुन व्हॅन मध्ये टाकुन पाटोदा पोलिस स्टेशनला नेण्यात आले. पाचेगावच्या पिडीत शेतकर्यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक बीड तसेच




उपविभागीय अधिकारी पाटोदा, तहसीलदार पाटोदा आणि पोलिस स्टेशन पाटोदा यांना मावेजा देईपर्यंत तारा ओढण्याचे काम बंद ठेवून आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी केली आहे. निवेदनावर विकास कृष्णाथ गिरे, बाळासाहेब भानुदास मुळे सतिश बाबुराव गिरे ,विष्णू राम सावंत ,रहिम मक्तुम शेख , मनोज विजय गिरे , विष्णु चांगदेव गिरे , प्रकाश महादेव सावंत,काकासाहेब मारोती गिरे ,हनुमंत राम सावंत आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांनी पिडीत शेतकऱ्यांना न्याय द्यावा :- डॉ.गणेश ढवळे

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांची कैफियत ऐकुन सखोल चौकशी करून त्यांना न्याय द्यावा. पवनचक्की कंपन्यांकडुन सशुल्क पोलिस संरक्षण घेऊन शेतकऱ्यांवर दडपशाही करण्याच्या प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत असुन यामुळे पोलिस प्रशासन व जिल्हा प्रशासनाची जनसामान्यात प्रतिमा मलिन होत असून शेतक-यांना कोणीही वाली नसल्याने प्रशासनाने शेतकऱ्यांचे तारणहार व्हावे अशी अपेक्षा सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ८ मे २०२५
https://lokaarambh.com


## संपादकीय

## निवडणुकांचा मार्ग मोकळा;

Justice delayed is justice denied अशी इंग्रजीत एक म्हण आहे. मराठीत त्याचा अर्थ काढायचा झाला, तर न्यायाला विलंब म्हणजे न्याय नाकारण्यासारखे असते. आज या म्हणीची पुन्हा आठवण झाली ती, सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात दिलेल्या एका निर्णयामुळे. उशिरा का होईना; परंतु सर्वोच्च न्यायालयाने तारीख पे तारीखमध्ये न पडता निवडणुकांचा मार्ग मोकळा केला ते बरे झाले. त्याबदल सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत. सत्तेतून समाजकारण आणि समाजकारणातून विकासाची प्रगती व्हावी, यासाठी पंचायत राज कायदा करणाऱ्या भारत देशात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतून निवडून आलेल्या प्रतिनिधींना जनतेचे प्रश्न मांडण्याची चांगली संधी मिळते. निधीचे वाटप गरजूंपर्यंत पोहोचण्यास मदत होते. महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदांच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. त्यातून लोकप्रतिनिधी निवडून येतात. महाराष्ट्रातील या निवडणुकांना गेले तीन ते साडेतीन वर्षे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या एका याचिकेमुळे खो बसला होता. त्यामुळे आयुक्त दर्जाचा सनदी अधिकारी प्रशासकाच्या भूमिकेतून महापालिकेचा कारभार सांभाळत होता. लोकसभा, विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिल्याने, गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेले राजकीय पक्षाचे माजी नगरसेवक, इच्छुक पदाधिकाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. त्याचबरोबर, नागरी सुविधासंदर्भात स्थानिक पातळीवर कोणाकडे बाजू मांडायची या विवंचनेत असलेल्या सर्वसामान्य नागरिकांना आधार मिळणार आहे. राज्यातील ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावर या निवडणुकांचे घोंगडं इतकी वर्ष प्रलंबित होते. मात्र, यंदाच्या निवडणुका घेताना, सन २०२२ मध्ये सादर झालेल्या बांठिया कमिशनच्या अहवालानुसार आधी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षणानुसारच घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाकडून दिल्याने, ओबीसी आरक्षणाला सध्या तरी धक्का बसणार नाही, हे अधोरेखित झाले. १९९४ ते २०२२ पर्यंत ओबीसी आरक्षणाची जी परिस्थिती होती, तीच परिस्थिती कायम राहणार आहे. तसेच, सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भातील याचिका पुढील सुनावणीसाठी ठेवली आहे. त्यावरील निकाल कधी लागेल हे आता सांगणे कठीण आहे. मात्र, यातून सुवर्णमध्य काढून सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रात निवडणूक कार्यक्रम जाहीर करा असे आदेश राज्य निवडणूक आयोगाला देण्याचा शहाणपणा याआधी ज्यांच्याकडे हे प्रकरण सुनावणीसाठी आले त्यांनी घेतला असता तर, बरं झालं असते. बांठिया कमिशनच्या अहवालानंतर ऑगस्ट २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत परिस्थिती मजैसे थेफ ठेवण्याचे निर्देश दिले होते. यासंदर्भात दाखल सर्व याचिकांवर मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. ज्यात केंद्र सरकारतर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी प्रलंबित निवडणुका व्हायला हव्यात, अशी भूमिका मांडली, तर विरोधक याचिकाकर्त्यांकडून ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ इंदिरा जयसिंह यांच्याकडून निवडणुका या २०२० च्या बांठिया कमिशन रिपोर्टमधील शिफारशींनुसारच घ्याव्यात, असा युक्तिवाद करण्यात आला होता. राज्यात पाच वर्षांपेक्षा अनेक प्रकरणात प्रशासक कार्यरत आहे. लोकप्रतिनिधींनी लोकल बॉडी चालवल्या पाहिजेत अशी राज्यघटनेत तरतूद आहे. पण त्या विपरीत हे सुरू आहे. औरंगाबाद आणि नवी मुंबईत पाच वर्षांपेक्षा अधिक काळ प्रशासकांचा आहे, ही बाब सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आली होती. लोकशाहीसाठी हे योग्य नसल्याचे ही कोर्टाच्या लक्षात आले. विशेष म्हणजे सुनावणी दरम्यान ओबीसी आरक्षणाशी संबंधित कुठल्याही याचिकेचा या निवडणुकांवर परिणाम होणार नाही. कारण यापुढे येणारे निकाल हे न्यायालयाच्या अंतिम निकालावर अवलंबून असतील. आरक्षणाच्या मुद्द्यावर इतकी वर्षे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न घेणे हे योग्य नाही. भारतीय संविधानाने नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकारांचे रक्षण होणेही तितकेच गरजेचे आहे, अशी टिप्पणी यावेळी सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे, नाशिकसह १४ महापालिकेच्या निवडणुका येत्या सप्टेंबरपर्यंत होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आपल्या देशात न्यायव्यवस्थेला आदराचे स्थान आहे. त्यामुळे न्यायालयाकडून आलेल्या निर्णयाकडे प्रशासन ही गांभीर्याने पाहतो. मात्र, गेल्या काही वर्षातील न्यायालयाकडून आलेले निर्णय, निकाल पाहता, ते व्यक्तीसाक्षेप असल्याचे दिसून आले आहेत. न्यायदानाच्या खुर्चीत जो बसतो, तो आपल्या आकलनशक्तीने कायद्याच्या भाषेत त्याचे प्रमाण ठरवून निर्णय देत असतो. त्यामुळे, अनेकदा असे म्हटले जाते की, न्यायालयाकडून मिळतो तो न्याय नव्हे, तर केवळ एक निर्णय असतो. भारताने लोकशाही प्रणाली स्वीकारली आहे. जनतेतून निवडून आलेले प्रतिनिधी राज्य कारभार सांभाळतात. त्यामुळे स्थानिक पातळीवर ममिनी राज्य कारभारफ चालविणाऱ्या महापालिकासारख्या निवडणुका गेले तीन वर्षे झाल्या नाहीत, ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास येऊनही या आधीच्या खंडपीठाने त्याकडे तितकेसे

# विद्यार्थी मित्रांनो दहावी आणि बारावी परीक्षा म्हणजेच आयुष्यात सर्व काही नाही

मविद्यार्थी मित्रांनो आणि पालकांनो लवकरच जीवनातील महत्वाचे टप्पे असलेल्या दहावी आणि बारावीचा निकाल आता लागणार आहे. अनेक विद्यार्थी, पालक निकाल कसा लागणार या काळजीने सध्या चिंताग्रस्त चेहऱ्याने फिरत आहेत. आपल्या शिक्षण पद्धतीत शिक्षण हे केवळ नौकरी मिळविण्याचे खात्रीशीर साधन म्हणून पाहिले गेल्याने या परीक्षांना विनाकारण अनन्यसाधारण महत्त्व दिले गेले आहे. या परीक्षा नक्कीच महत्वाचे टप्पे आहेत. पण, तेच सर्व काही नाही.फ दहावी आणि बारावी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना डॉ.राजेश इंगोले यांचे मौलिक मार्गदर्शन..! वाचकांच्या माहितीस्तव देण्यात येत आहे. दहावी आणि बारावी या परीक्षा केवळ पुढील शिक्षणासाठी किंवा करियरच्या संधीसाठी एक आधारभूत भूमिका बजावतात. पण, त्या आपल्या सर्व जीवनाचे किंवा यशाचे पैलू निश्चित करीत नाहीत. वास्तविक पाहिले तर इतर परिक्षांप्रमाणे याही साधारण परीक्षाच आहेत. पण, केवळ आपल्या देशातील करियरच्या वाटा या परिक्षानंतर ठरविल्या जातात म्हणून हे महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे अकारण परीक्षार्थी, पालक, शिक्षक यांनाही याचा ताणतणाव येत आहे. दहावी आणि बारावीचा निकाल आणि मानसिकता याचे विश्लेषण करणे मला आता अत्यावश्यक वाटत आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक स्थितीवर परीक्षेच्या निकालाचा कसा परिणाम होतो, हे स्पष्ट करणे गरजेचे आहे. निकालाची प्रतीक्षा, निकाल लागल्यावर होणारी प्रतिक्रिया आणि त्यातून होणारे भावनिक बदल या सारख्या बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. दहावी आणि बारावीचा निकाल लागण्याची वाट पाहणे ही एक तणावपूर्ण प्रक्रिया असू शकते. यात विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना



डॉ.राजेश इंगोले
(मानसोपचार व विद्यार्थी समुपदेशक तज्ज्ञ, अंबाजोगाई.)
मो.९४२२२४०७१०


ताणतणाव, उदासीनता, उत्सुकता, कुतूहल, भीती या संमिश्र भावना असू शकतात. निकाला नंतरची प्रतिक्रिया विविध प्रकारची असू शकते. निकाल लागल्यावर विद्यार्थी आनंद, निराशा किंवा आश्चर्य व्यक्त करू शकतात. निकालाचे परिणाम त्यांच्या मानसिक आरोग्यावर आणि भविष्यावर परिणाम करू शकतात. निकालामुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य, चिंता, किंवा तणाव येऊ शकतो. काही विद्यार्थी चांगले निकाल मिळवूनही आत्मसमर्पणाच्या भावनांशी संघर्ष करू शकतात. काही विद्यार्थी नकारात्मक विचार आणि तुलना करू शकतात, ज्यामुळे त्यांना आत्मसमर्पणाची भावना येऊ शकते. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन असणे महत्त्वाचे आहे. त्यांना आपल्या चुकांमधून शिकण्याची आणि भविष्यासाठी तयारी करण्याची प्रेरणा मिळाली पाहिजे. त्याकरिता पालक, शिक्षक, जेष्ठ, श्रेष्ठ, नातेवाईक व्यक्तींकडून त्या विद्यार्थ्याला सामाजिक पाठबळ, मानसिक बळ मिळाले पाहिजे. त्यांच्या मनात काय चालू आहे हे पालकांनी जाणीवपूर्वक काढू न घेतले पाहिजे किंवा ते व्यक्त करण्यासाठी आपल्या पाल्याला प्रवृत्त केले पाहिजे. विद्यार्थी त्यांच्या मित्र, कुटुंब आणि शिक्षकांकडून सामाजिक पाठबळ मिळवू शकतात. त्यांना आपल्या भावना व्यक्त करण्याची आणि मदतीसाठी विचारण्याची आवश्यकता आहे. पालकांना अथवा विद्यार्थ्याला गरज वाटल्यास, मानसिक आरोग्य तज्ज्ञांची मदत घेणे आवश्यक आहे. ते विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन आणि समर्थन देऊ शकतात. मानसिक आरोग्यासाठी काही महत्वाच्या टिप्स खालीलप्रमाणे आहेत. निरोगी जीवनशैली आवश्यक आहे. नियमित व्यायाम, पौष्टिक आहार आणि पुरेसा आराम घेणे आवश्यक आहे. ध्यान आणि योगा करून मनाला शांत करू शकतो. ध्यान आणि योग केल्याने तणाव कमी होऊ शकतो आणि मानसिक शांतता मिळू शकते. सामाजिक संवाद असणे आवश्यक आहे. कारण, मनातला कोंडमारा इतरांना सांगितल्याने मन मोकळे होते. मनातले द्वंद्व, प्रश्न सोडविण्यास इतर व्यक्तीचे मार्ग, पर्याय उपलब्ध होतात. मित्र आणि कुटुंबियांसोबत वेळ घालवणे आणि त्यांच्याशी संवाद साधणे आवश्यक आहे.यामुळे एकांतात येणारे डॉ.राजेश इंगोले (मानसोपचार व विद्यार्थी समुपदेशक तज्ज्ञ, अंबाजोगाई.) मो.९४२२२४०७१० नकारात्मक विचार नष्ट होतात किंवा इतरांसोबत हे विचार बोलता येतात. गरज वाटल्यास, मानसिक आरोग्य तज्ज्ञांची मदत मागा. सकारात्मक विचार करणे आणि आत्मविश्वास असणे महत्त्वाचे आहे.या सर्व बाबींवरून खालील निष्कर्ष आपण काढू शकतो. दहावी आणि बारावीचा निकाल विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर मोठा प्रभाव टाकू शकतो. या काळात विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन आणि समर्थन देणे आवश्यक आहे. मानसिक आरोग्याच्या समस्या असल्यास, तज्ज्ञांची मदत घेणे आवश्यक आहे. दहावी आणि बारावीच्या परीक्षा केवळ एक आधारभूत भूमिका बजावतात आणि तुम्हाला पुढील शिक्षणासाठी आणि करिअरसाठी तयार करतात आपण आपल्या आवडीचे आणि क्षमतांचे पालन करून वेगवेगळ्या मार्गांनी आपले जीवन यशस्वी करू शकतो. उदाहरणार्थ काही विद्यार्थी चांगले गुण मिळवितात पण, त्यांना आवडत्या क्षेत्रात काम करायला संधी मिळत नाही काही विद्यार्थी दहावी बारावीत चांगले गुण मिळवितात. पण, त्यांना उच्च शिक्षण किंवा चांगली नौकरी मिळत नाही. काही विद्यार्थी दहावी - बारावीत चांगले गुण मिळवितात व आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम ही करतात आणि यशस्वी होतात.

## अवकाळीसह गारपिटीचा तडाखा, मराठवाड्यात बळीराजावर पुन्हा संकट

बीड । प्रतिनिधी राज्यभरात अवकाळी पावसाने हजेरी लावली असून बीड, गेवराई, लालना, हिंगोलीसह बहुतांश ठिकाणी अवकाळी पावसाने मोठे नुकसान केले आहे. काही भागात गारपीट, वादळी वाऱ्यांची हजेरीही लागली. दरम्यान, मराठवाड्यात पुढील पाच दिवस काही भागात अवकाळी पावसाचा जोर वाढणार असल्याचं हवामान विभागानं सांगितलंय. मराठवाडयात दिनांक ०९ ते १५ मे २०२५ दरम्यान पाऊस सरासरीपेक्षा जास्त, कमाल तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा कमी व किमान तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाचा अंदाज काय? प्रादेशिक हवामान केंद्राने दिलेल्या अंदाजानुसार, दिनांक ०६ मे रोजी छत्रपती संभाजी नगर, परभणी, हिंगोली, नांदेड व जालना जिल्हयात तर दिनांक ०७ मे रोजी छत्रपती संभाजी नगर, जालना व बीड जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ५० ते ६० कि.मी.) राहून गारपीटीसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक ०६ मे रोजी बीड, लातूर व धाराशिव जिल्हयात तर दिनांक ०७ व ०८ मे रोजी नांदेड, लातूर व धाराशिव जिल्हयात जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ४० ते ५० कि.मी.) राहून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक ९ व १० मे रोजी मराठवाडयात तूरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाडयात पुढील तीन दिवसात कमाल तापमानात हळूहळू २ ते ३ अं.से. ने घट होऊन त्यानंतर २ ते ३ अं.से. ने वाढ होण्याची तर पुढील चार ते पाच दिवसात किमान तापमानात फारशी तफावत जाणवनार नाही. मराठवाडयात दिनांक ०९ ते १५ मे २०२५ दरम्यान पाऊस सरासरीपेक्षा जास्त, कमाल तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा कमी व किमान तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी काय करावे? काढणी केलेल्या हळद पिकाची उकडणे, वाळवणे व पॉलीश करणे ही कामे करून मालाची सुरक्षित ठिकाणी (गोदामात) साठवणूक करावी. उन्हाळी भुईमूग पिकात आवश्यकतेनूसार तुषार सिंचन पध्दतीने पाणी व्यवस्थापन करावे. उन्हाळी भुईमूग पिकात रसशोषण करणाऱ्या (मावा, तुडतुडे, फुलकीडे व पांढरी माशी) कीडींना आकर्षीत करण्यासाठी एकरी १० ते १२ पिवळे व निळे चिकट सापळे लावावेत व तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचे व लाल केसाळ अळीचे समूहातील अंडी लहान अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात. उन्हाळी भुईमूग पिकात रसशोषण करणाऱ्या किडींचा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची किंचा ॲझाडिरेक्टिन (३० पीपीएम) ३ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फळबागेचे व्यवस्थापन पान १/४ वरून घड लागलेल्या केळी झाडांना काठीने आधार द्यावा. काढणीस तयार असलेल्या केळीच्या घडांची काढणी लवकरात लवकर करून घ्यावी. केळी बागेस आवश्यकतेनूसार सरी वरंब्याने पाणी द्यावे. जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी व जमिनीचे तापमान संतुलित राहण्यासाठी केळी फळझाडाच्या आळयात आच्छादन करावे. नविन लागवड केलेल्या केळीच्या रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रोपांना सावली करावी. काढणीस तयार असलेल्या आंबा फळांची काढणी करून घ्यावी. जोराच्या वादळी वाऱ्यामुळे फळगळ व फांद्या तुटल्या असल्यास पडलेली फळे व तुटलेल्या फ़ांद्या गोळा करून विल्हेवाट लावावी. आंबा बागेत पाण्याचा ताण बसल्यामूळे फळगळ होऊ शकते, फळगळ होऊ नये म्हणून आंबा बागेत आवश्यकतेनूसार पाणी

# भारतानं आमची मजाक उडवली, पाकिस्तानच्या पंतप्रधानांचं मोठं वक्तव्य

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीमध्ये असलेल्या दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर एअर स्ट्राईक केला. या हल्ल्यामध्ये पीओके आणि पाकिस्तानमध्ये असलेल्या दहशतवाद्यांचे 9 अड्डे उद्ध्वस्त झाले आहेत. या हल्ल्यानंतर पाकिस्तानचा चांगलाच जळफळाट झाला आहे. भारतानं केलेल्या एअर स्ट्राईकनंतर पाकिस्तानने तातडीने आपल्या सुरक्षा विभागाची एक उच्चस्थरीय बैठक बोलावली, या बैठकीमध्ये भारताकडून करण्यात आलेल्या एअर स्ट्राईकवर चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार प़डली, या बैठकीला मंत्रिमंडळातील सर्व मंत्री, सर्व राज्यांचे मुख्यमंत्री आणि लष्कर प्रमुखांची उपस्थिती होती. दरम्यान दुसरीकडे संसदेमध्ये बोलताना पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी पुन्हा एकदा पोकळ धमकी दिली आहे. भारताने फक्त आमच्यावर हल्ला केला नाहीये, तर आमची मजाक उडवली आहे. भारतानं 80 विमानांच्या मदतीनं पाकिस्तानवर हल्ला केला, ज्या पद्धतीने हा हल्ला झाला, त्याला कायम आम्ही लक्षात ठेऊ, पहलगामवर जेव्हा दहशतवादी हल्ला झाला तेव्हा माझं अनेक देशांसोबत बोलणं झालं होतं, मी संपूर्ण जगाला सांगितलं



होतं की, पहलगाममध्ये जो हल्ला झाला, त्याचं पाकिस्तानशी काही देणं घेणं नाही, मात्र भारतानं आमचं म्हणणं ऐकलं नाही, भारताकडून एअर स्ट्राईक करण्यात आला, भारतानं आमच्यावर हल्ला केला नाही, तर आमची मजाक उडवली, असं शरीफ यांनी म्हटलं आहे.शंभर पेक्षा अधिक दहशतवादी ठार दरम्यान भारतानं मध्यरात्री पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानवर एअर स्ट्राईक केला. या हल्ल्यामध्ये दहशतवाद्यांची 9 पेक्षा अधिक स्थळ उद्ध्वस्त करण्यात आली असून, शंभर पेक्षा अधिक दहशतवाद्यांचा मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. दुसरीकडे पाकिस्तानकडून असा दावा देखील करण्यात आला आहे की, भारतानं फक्त एअर स्ट्राईकच केला नाही तर आमच्या धरणांवर देखील बॉम्ब फेकले त्यामुळे धरणांचं मोठं नुकसान झालं आहे. भारतीय सैनिकांनी नीलम आणि नौसेरी धरणात बॉम्ब टाकल्याचा दावा पाकिस्तानने केला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ८ मे २०२५
https://lokaarambh.com



# श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे जादा बसेस सोडाव्यात : नितेश उपाध्ये



बीड : श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे जादा बसेस सोडाव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांनी केली आहे. श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे सद्गुरू संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या २५ व्या पुण्यस्मरणार्थ रौप्य महोत्सवी सोहळा दि. ७ जून २०२५ ते १४ जून २०२५ पर्यंत साजरा केला जाणार आहे. यानिमित्ताने परमपूज्य पंडित श्री प्रदीप मिश्रा महाराज( सिहोरवाले) यांचे शिवमहापुराण कथामृताचे आयोजन करण्यात आले असून ग्र थराज ज्ञानेश्वरी परायण ज्ञान यज्ञ देखील होणार आहे. या सोहळ्याला लाखो भाविक भक्तांची उपस्थिती अपेक्षित असल्याने बीड सह जिल्ह्यातील सर्वच एस.टी. आगारातून चाकरवाडी येथे विशेष ज्यादा बसेस सोडाव्यात, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते नितेश उपाध्ये ,नितीन जायभाये डॉ. संजय तांदळे यांनी दि.५ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड आणि एस. टी .महामंडळाच्या विभाग नियंत्रक दुसाने यांना निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनानंतर विभाग नियंत्रक दुसाने यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी त्यांनी चाकरवाडी येथे येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून बीड सह जिल्ह्यातील सर्वच स्थानकांतून ज्यादा बसेस उपलब्ध करून दिल्या जातील अशी ग्वाही दिली.

# शुक्रवारी होणाऱ्या हंडा मोर्च्यात शामिल व्हा : रूपालीताई देशपांडे



बीड : सध्या तीव्र उन्हामुळे उन्हाची तीव्रता वाढली असून बीड शहर व परिसरात बीड नगरपरिषद च्या हलगर्जी पणा मुळे मोठ्या प्रमाणात पाणी ट ंचाई जाणवत आहे नागरिकांना पाण्यासाठी वन वन फिरावे लागतात येणाऱ्या शुक्रवारी ९ मे २०२५ रोजीच्या हंडा मा ेच्या 'स शरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात शामिल व्हावे असे आव्हान समाजसेविका रूपाली देशपांडे यांनी के ले. या बाबत पुढे बोलताना रुपाली देशपांडे यांनी सा ंगितले बिंदुसरा धरण व माजलगाव बँक वॉटर योजनेच्या माध्यमातून पाण्याचा पुरवठा केला जातो. परंतु माजलगाव बँक वॉटर काडी वडगाव येथे अनेक दिवसापासून पाईपलाइन फुटू न सुद्धा बीड नगरपरिषद दुर्लक्ष करत असल्याने शरातील नागरिक पाण्यासाठी वण वण फिरत असल्यामुळे बीड शरातील अनेक नगरसेवक सामाजिक कार्यकर्ते विविध पक्षातील नेत्याच्या उपस्थित दिनांक ९ मे २०२५ रोजी शुक्रवार वेळ सकाळी ११ वाजता बलभीम चौक ते बीड नगरपरिषद कार्यालयावर नागरिकांच्या पाणी संदर्भात हंडा मोर्चात शहरातील नागरिकांनी उपस्थित राहावे असे आव्हान समाजसेविका रुपालीताई देशपांडे यांनी केले.

# शांतिलिंग अप्पा कापसे यांचे दु:खद निधन



गेवराई : गेवराई शहरातील वीरशैव समाजातील जेष्ठ शिक्षक शांतिलिंग अप्पासाहेब कापसे यांचे दि. ०४ वार रविवार रोजी सायंकाळी चार च्या सुमारास दुःखद निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय ८८ होते त्यांच्या पश्चात २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.ज्या वेळी कोणतेही शिकवण्या किंवा क्लासेस नव्हते त्याकाळी शांतिलिंग अप्पा कापसे यांनी १९७५ मध्ये गेवराई शहरातील पाहिली घावटी शाळा मेन रोड येथील रेणुका देवी मंदिरात सुरु केली होती त्यांच्या या शाळेने शहरातील विद्यार्थ्यांना गणिताचे धडे गिरवायला शिकवले होते व यामधून खूप विद्यार्थी घडवले आहे.त्यांच्या जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या केज तालुकाध्यक्षपदी दिनकर जाधव यांची निवड



बीड : केज तालुक्यातील सारणी (सांगवी) येथील रहिवासी असलेले तथा गेल्या दीड दशकाहून अधिक काळ पत्रकार क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करत सामाजिक प्रश्न सरकार दरबारी मांडणारे पत्रकार दिनकर किसनराव जाधव यांची राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या केज शाखेच्या तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जान असणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. गेल्या दीड दशकापासून त्यांच्या पत्रकारितेमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अधिक अधिक आवाज उठवण्याचे काम त्यांनी केले आहे. तसेच अनेक सामाजिक प्रश्न त्यांनी शासन दरबारी मांडत त्याचा पाठपुरावा केलेला आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी, राज्य अध्यक्ष विष्णू कंकाळ यांच्या आदेशाने राज्य सचिव दत्तात्रय मुजमुले यांनी दिनकर किसनराव जाधव यांची केज तालुका अध्यक्षपदी निवड केली आहे. या निवडीबद्दल त्यांचे राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# स्थानिक संस्था निवडणुका आता टप्प्याटप्प्याने होणार

## राज्य निवडणूक आयोग न्यायालयाला वेळापत्रक देणार


## आरक्षणाबाबतचे अनेक प्रश्न अनुत्तरित

मुंबई (प्रतिनिधी):- २०२२ पूर्वी महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ओबीसी समाजाला आरक्षण देऊन ४ महिन्यांत निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. मात्र, सर्व निवडणुका एकत्रित घेणे शक्य नाही. तसेच पावसाळाही आहे. यामुळे टप्प्याटप्प्याने निवडणूक घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोग पुन्हा सर्वोच्च न्यायालयाकडे जाण्याची चिन्हे आहेत. पहिल्या टप्प्यात ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये नगर परिषदा, ऑक्टोबरमध्ये जिल्हा परिषदा व नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये महापालिका निवडणूक घेण्याचे



वेळापत्रक न्यायालयाला सादर करून न्यायालयाच्या निर्देशानुसार कार्यक्रम जाहीर होऊ शकेल, असे एका उच्च पदस्थ अधिकाऱ्याने सांगितले. ओबीसी आरक्षणाच्या वैधतेला दिलेले आव्हान, ५० टक्क्यांच्या मर्यादेचे उल्लंघन, बांठिया आयोगाने ओबीसींच्या जागा कमी करणे अशा अनेक मुद्यांमुळे मागच्या ५ वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. अखेर आज सर्वोच्च न्यायालयाने ४ आठवड्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची अधिसूचना काढण्याचे व ४ महिन्यांच्या आत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे प्रयत्न करावेत, असे निर्देश राज्य निवडणूक आयोगाला दिले; पण त्याच वेळी मुदतवाढ मागण्याचे स्वातंत्र्यही आयोगाला दिले आहे. राज्यातील २९ महानगरपालिका, २४८ नगर परिषदा ४२ नगर पंचायती, ३४ जिल्हा परिषदा, ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुका घ्यायच्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले असले तरी या सर्व निवडणुका ४ महिन्यांत तेही पावसाळा सुरू असताना घेणे कठीण आहे. यामुळे टप्प्याटप्प्याने या निवडणुका घ्याव्या लागतील. न्यायालयाने आयोगाला आवश्यकता भासल्यास परत न्यायालयाकडे येण्याचे स्वातंत्र्य अबाधित असल्याचे सांगितले आहे. याचाच आधार घेऊन राज्य निवडणूक आयोग न्यायालयाकडे निवडणुकीचे वेळापत्रक घेऊन जाईल व न्यायालयाने मान्यता दिल्यास पावसाळ्याच्या शेवटच्या टप्प्यापासून डिसेंबर-जानेवारीपर्यंत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असे उच्च पदस्थ अधिकाऱ्याने सांगितले.

# बीडमध्ये स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यावसाय; नाशिकच्या पीडितेची सुटका



बीड : शहरातील गजबजलेल्या आणि मध्यवर्ती ठिकाण असलेल्या सारडा कॅपिटलमधील एका तळघरात स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यावसाय चालू होता. ही माहिती मिळताच बीड शहर पोलिसांनी डमी ग्राहक पाठवून मंगळवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास कारवाई केली. यामध्ये चालकाला बेड्या ठोकल्या असून नाशिकच्या पीडित महिलेची सुटका करण्यात आली आहे. प्रमोद सदाशिव शेळके (रा. नेकनूर ता.बीड) असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे. बीड शहरातील सारडा कॅपिटल परिसरात एका कोपऱ्यातील तळघरात ब्लीस नावाचे स्पा सेंटर आहे.

# रानडुकराच्या हल्ल्यात शेतकरी जखमी



लिंबागणेश : वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास २० लाखांपर्यंत मदत दिली जाते.१० लाख रूपये धनादेशाद्वारे तर १० लाख रुपये राष्ट्रीयकृत बँकेत असलेल्या दरमहा व्याज देणाऱ्या संयुक्त खात्यांमध्ये जमा केले जातात. तसेच अपंग झाल्यास ५ लाख रुपये, व्यक्ती गंभीर जखमी झाल्यास १ लाख २५ हजार रुपये व किरकोळ जखमी झाल्यास २० हजार रुपये औषधोपचारासाठी खर्च दिला जातो. मात्र बहुतेक वेळा याची माहिती वनविभागाला दिली जात नसल्याने जखमी मदतीपासून वंचित राहिल्याचे दिसून येते कारण मदतीसाठी हल्ला झाल्यानंतर ४८ तासाच्या आत वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना कळवुन ३ दिवसांच्या आत पंचनामा होणे अपेक्षित असते तरच लाभास संबंधित पात्र ठरतो. नानासाहेब श्रीरंग हजारे यांच्या बाबतीत हल्ल्याची घटना उलटून १५ दिवस झाल्याने सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी बीड वनपरीक्षेत्र अधिकारी अशोक काकडे यांच्याशी संवाद साधत बीड जिल्हा रुग्णालयातील कागदपत्रे तपासून सहानुभूती पुर्वक विचार करून मदत द्यावी अशी विनंती केल्यानंतर सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन अशोक काकडे यांनी दिले आहे.

# धारुर ग्रामीण रुग्णालय 100 खाटांचे उपजिल्हा रुग्णालय करण्यासाठी प्रयत्नशील : आ. प्रकाश सोळंके

किल्लेधारुर : धारुर ग्रामीण रुग्णालयाचे रुपांतर १०० खिटांचे उपजिल्हा रुग्णालयात रुपांतरीत करण्यासह ट्रामा केअर सुरु करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी डायलेसिस व कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी केले. येथील ग्रामीण रुग्णालयात बिनटाक्याची कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिर, डायलेसिस सेंटर व महात्मा फुले आरोग्य सेवा केंद्राचे उद्घाटन आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या हस्ते मंगळवार दि.६ रोजी करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हा शल्यचिकित्सक संजय राऊत यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले जनआरोग्य सेवा केंद्र, डायलेसिस सेंटरची फित कापुन उद्घाटन करुन



झाली. यावेळी बोलताना आ. सोळंके यांनी मतदारसंघातील गोरगरीब जनतेला जलद व चांगल्या दर्जाची आरोग्य सेवा मिळावी यासाठी माजलगाव येथे स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, वडवणी येथे ग्रामीण रुग्णालय, धारुर तालुक्यातील तेलगाव येथे ट्रामा केअर युनिट व ग्रामीण रुग्णालय उभारल्याचे सांगितले. याच धर्तीवर धारुर ग्रामीण रुग्णालयालाही उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळवून १०० खाटांचे रुग्णालय व ट्र ामा केअर युनिट सुरु करण्यासाठी शासन दरबारी प्रस्ताव दाखल केल्याचे सांगितले. जिल्ह्यात एकमेव असलेल्या डायलेसिस सेंटरच्या माध्यमातून येथील वैद्यकीय अधिकारीच नव्हे तर कर्मचाऱ्यांनीही रुग्णाना चांगली व दर्जेदार आरोग्य सेवा द्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक संजय राऊत यांनी मार्गदर्शन केले. यावेळी राष्ट्र वादी काँग्रे सचे जिल्हा सरचिटणीस सय्यद शाकेर, तालुकाध्यक्ष आमोल जगताप, शहराध्यक्ष नितिन शिनगारे, माजी नगरसेवक शेख फसियोद्दीन, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शहाजी लोमटे यांच्यासह आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी उत्कृष्ट सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा आ. सोळंके यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्तविक वैद्यकीय अधिक्षक डॉ. परदेशी यांनी सुत्रसंचालन ड. परमेश्वर शिनगारे यांनी तर आभार डॉ. शेख परवेज यांनी मानल

# बीड शहरवासियांना चार दिवसाला स्वच्छ पाणीपुरवठा व घंटागाडी नियमित चालू करा : बजगुडे

बीड : बीडकरांच्या जिव्हाळ्याचा व मुलभूत असा पाणीप्रश्न, घंटागाडी, स्वच्छ्तेसह विविध प्रश्नांवर आज काँग्रेसचे गणेश दादा बजगुडे पाटील यांच्या नेतृत्वात नगर पालिका प्रशासनाला घेराव घालन्यात आला. बीड शहरवासीयांची प्रचंड अवहेलना नगर पालिका प्रशासनाकडू न सुरु असुन महिनाभरात एकदा ते पण अस्वच्छ पाणी शहरात सोडण्याचा महाप्रताप नगर पालिका करत असुन तो तत्काळ थांबवावा व शहरवासीयांना किमान चार दिवसाला स्वच्छ पाणीपुरवठा करण्यात



यावा. त्याच बरोबर शहरात कचरा गोळा करण्यासाठी असलेली नियमित घंटागाडी फक्त नावालाच आहे की काय ती कुठ ेही नियमितपणे आढळुन येत नाही. ती नियमित शहराच्या सर्व भागात घंटागाडी तत्काळ सुरू करण्यात यावी. शहरात जागोजागी असलेले कचऱ्याचे ढीग उचलण्यात यावेत. शहरातील नाल्या चार चार महिने नकाढल्यामुळे कोंडलेल्या आहेत त्या पहिल्याच पावसात तुडु ब भरुन रस्त्यावर गटारगंगा वाहील यासाठी नाल्या तत्काळ काढण्यात याव्यात व किमान आठ दिवसाला नियमित सर्व नाल्या काढल्या जाव्यात. त्याच बरोबर नगर पालिकेने जमा केलेला कचरा शहरात किंवा शहरवासीयांना त्रास होईल अशा ठिकाणी टाकु नये. यासर्व शहरवासीयांच्या महत्वाच्या प्रश्नांवर आज काँग्रे स पक्षाच्या वतीने नगर पालिकेचे मुख्याधिकारी अंधारे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी काँग्रे सचे गणेश दादा बजगुडे पाटील, गणेश राउत, संभाजी जाधव, रामधन जमाले, शेख रियाज, कादर बाबा इनामदार, हनुमान घोडके, शेख बबलु भाई, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयाची बारावी बोर्ड परीक्षेत उज्वल यशाची परंपरा कायम

किल्ले धारूर : येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या बारावी बोर्ड परीक्षेत विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील बारावी विज्ञान शाखेचा निकाल ९८.९५% असून विज्ञान शाखेमध्ये सर्वप्रथम कु. शेळके सायली एकनाथ ८५.६७%, द्वितीय चंदनशिव प्रांजळ किशोर ८५.१७% व तृतीय क्रमांक कु. काळे वेदिका सिद्धेश्वर ८५.००% यांनी प्राप्त केला. वाणिज्य शाखेचा ९४.११ टक्के निकाल आहे. वाणिज्य शाखेतून प्रथम कु. उरवंडे शिवकन्या छत्रभुज ७६.५०%, द्वितीय क्रमांक मनेरी करण कृष्णा ७५.८३% तर तृतीय क्रमांक भालेराव ऋतुजा सुखदेव व सुरवसे ओम अण्णासाहेब ७५.१७% या विद्यार्थ्यांनी मिळविला. तर कला शाखेचा ९६.७०% निकाल असून कला शाखेत प्रथम क्रमांक शेख सादिया फारुख ७७.३३%, द्वितीय कु. पारशी साक्षी भीमनाथ ७६.३३% तर तृतीय क्रमांक कु. वाघचौरे मालन चंद्रसेन ७५.६७% यांनी प्राप्त केला. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी २०२५ बारावी बोर्ड परीक्षेत मिळविलेल्या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके, सचिव आ. सतीश चव्हाण, महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख सदस्य श्री. जयसिंग सोळंके, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य श्री. लोभाजी चव्हाण, श्री. अजयसिंह दिख्खत, महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य डॉ. राम शिनगारे, श्री. इं. ना. जाधव यांनी बारावी बोर्ड परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भावी शैक्षणिक शुभेच्छा व्यक्त केल्या.

# बीड नगरपरिषद प्रशासनाच्या विरोधात निघणाऱ्या हंडा मोर्चात उपस्थित रहा : ॲड. संध्याताई राजपूत



बीड : शहराला कधी नव्हे ते अभुतपूर्व पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असून मागील एक महिन्यापासून शहराचा पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झालेला असून शहरातील नागरिकांना स्वतःच्या खिशाचे पैसे खर्च करून पाणी विकत घ्यावे लागत आहे .त्यामुळे शहरातील नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच सर्वसामान्य गोरगरीब नागरिक पाणी घेऊ शकत नाहीत ते दारोदारी पाण्यासाठी फिरत असल्याचे चित्र शहरात सध्या दिसत असून ,पाणी नसल्यामुळे शहरातील नागरिक महिला लेकीबाळी रात्री अपरात्री पाण्यासाठी वन-वन फिरताना दिसत आहेत. नगर परिषदेच्या ढिसाळ व नियोजन शून्य कारभारामुळे शहरातील नागरिकांना संकटाचा सामना करावा लागत आहे. यामुळे शहरातील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष व संताप निर्माण झालेला आहे .त्यामुळे दिनांक ९ मे २०२५ शुक्रवारी बीड नगर परिषदेच्या प्रशासना विरोधात निघणारे हंडा मोर्चात मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन भारतीय जनता पार्टी महिला प्रदेश सचिव व महाराष्ट्र करणी सेनेच्या महिला प्रदेशाध्यक्ष अँड.संध्याताई राजपूत यांनी केले आह

# राज्यात ठिकठिकाणी अवकाळी पाऊस, पुढील ३ तास धोक्याचे, हवामान विभागाचा अंदाज काय?

मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये आज अवकाळी पावसाने हजेरी लावली. जोरदार वारे आणि अवकाळी पडणाऱ्या पावसामुळे मुंबई लोकल विस्कळीत झाली आहे. यामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. त्यातच आता हवामान विभागाने मुंबईसह महाराष्ट्राला सतकर्तचा इशारा दिला आहे. पुढील काही तासांमध्ये अधिक पाऊस होऊ शकतो, असा इशारा हवामान विभागाने दिला आहे. मुंबई शहर आणि उपनगरांसह ठाणे, पालघर आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये पुढील ३ ते ४ तासांत जोरदार वाऱ्यासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, मुंबईत ५०-६० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहू शकतात. त्यामुळे नागरिकांनी घराबाहेर पडताना आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन हवामान विभागाने केले आहे. अनावश्यक प्रवास टाळावा हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानंतर नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा. तसेच सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत



आहे. ज्या प्रवाशांना अत्यावश्यक कामासाठी बाहेर पडावे लागत आहे, त्यांनी हवामानाचा अंदाज घेऊन त्यानुसार तयारी करावी. रेल्वे प्रशासनाकडून वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू असले तरी, प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागू शकतो, अशीही सूचना प्रशासनाने केली आहे. वाऱ्यामुळे झाड कोसळण्याच्या अनेक घटना रायगड जिल्ह्यामध्ये अवकाळी पाऊस दाखल झाला आहे. या पावसामुळे वीज पुरवठादेखील बंद करण्यात आला आहे. विजांच्या कडकडाटासह पाऊस दाखल मोठ्या प्रमाणात वारे देखील वाहू लागले आहेत. नागोठणे, रोहा, पाली या भागात विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस आणि वारे वाहत आहेत. कल्याण-डोंबिवलीत सोसाट्याच्या वाऱ्यामुळे झाड कोसळण्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. कल्याण पूर्वेकडील रचना पार्क परिसरात एक झाड कोसळले. यात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, कल्याण पूर्व चिंचपाडा रोड परिसरात एक झाड रिक्षावर कोसळल्याने दोन वृद्ध प्रवासी अडकले आहेत. अग्निशामक दल आणि स्थानिक नागरिक त्यांना बाहेर काढण्याचे काम करत आहेत. दहिसर पूर्वेकडील दलवी कंपाऊंड, बलिराम इंडस्ट्रीसमोर एस. व्ही. रोडवर जोरदार वाऱ्यामुळे एक झाड कोसळल्याने वाहतुकीला आणि स्थानिक नागरिकांना त्रास झाला.

## मोदीला जाऊन सांगा म्हणणाऱ्यांना मोदींचं चोख प्रत्युत्तर..; कौस्तुभ गनबोटेंच्या पत्नीची प्रतिक्रिया

'ऑपरेशन सिंदूर'द्वारे भारताने पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा सूड घेतला आहे. भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि पीओकेमध्ये 9 ठिकाणी हवाई हल्ले केले आहेत. 22 एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम इथं दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. या हल्ल्या 26 निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला होता. पहलगाममधील हल्ल्यात पुण्यात राहणाऱ्या कौस्तुभ गनबोटे यांचाही मृत्यू झाला होता. गनबोटे हे कुटुंबीयांसह काश्मीरला फिरायला गेले होते. पर्यटकांवर गोळ्या झाडल्यानंतर दहशतवाद्यांनी "मोदीला जाऊन सांगा की आम्ही काय केलं" असं काही महिलांना म्हटलं होतं. अशा दहशतवाद्यांना आता मोदींनी चोख प्रत्युत्तर दिलंय, अशी प्रतिक्रिया गनबोटे यांच्या पत्नी



संगीता गनबोटे यांनी दिली."ऑपरेशन सिंदूर हे अत्यंत समर्पक नाव आहे. मोदींनी अत्यंत योग्य पाऊल उचचलं आहे. दहशतवादी म्हणाले होते की मोदीला जाऊन सांगा की आम्ही काय केलंय, त्याला आता मोदींनी चोख प्रत्युत्तर दिलं आहे. आता पाकिस्तानला चांगला धडा मिळाला आहे. जर अजूनही त्यांनी धडा घेतला नसेल तर मोदी याहून कठोर पावलं उचलतील याची खात्री आहे", असं संगीता गनबोटे म्हणाल्या. कौस्तुभ गनबोटे हे त्यांची पत्नी संगीता, संतोष जगदाळे, त्यांची पत्नी आणि जगदाळेंची मुलगी असे सर्वजण काश्मीरला फिरायला गेले होते. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देश मोदी सरकारकडे दहशतवाद्यांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी करत होता. भारतीय सैन्याने दहशतवाद्यांना मारून निष्पाप लोकांच्या मृत्यूचा सूड घ्यावा, अशी सर्वांचीच इच्छा होती. आता पहलगाम हल्ल्याच्या दोन आठवड्यांनंतर भारतीय सशस्त्र दलांनी मंगळवारी रात्री उशिरा पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील (पीओके) नऊ दहशतवादी छावण्यांवर क्षेपणास्त्र हल्ले केले. ज्यात लष्कर-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा बालेकिल्ला असलेल्या बहावलपूरचाही समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'ऑपरेशन सिंदूर'चं बारकाईने निरीक्षण केलं. ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानच्या कोणकोणत्या ठिकाणांवरील दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यात आले.. बहावलपूरमधील दोन ठिकाणं मुरीदके मुझफ्फराबाद कोटली गुलपूर भिंबर चक अमरू सियालकोट

## नंतर कुठं दडी मारुन बसले लष्कर प्रमुख असीम मुनीर?

भारताने मॉक ड्रीलची रंगीत तालीम करण्याचे जाहीर करीत पाकिस्तानला गाफील ठेवले आणि मॉकड्रीलच्या पूर्व संध्येलाच पाकिस्तानला धडा शिकवला. या हल्ल्यात भारताने आपली सीमारेषा ओलांडून १०० किमी आत जाऊन मोठे हल्ले केल्याने पाकिस्तानचे नाक ठेचले गेले आहे. पहलगामच्या बदल्यानंतर पाकिस्तानच्या सत्तेचे खरे मानकरी असलेल्या पाकचे लष्कर प्रमुख असीम मुनीर दडी मारुन बसले आहेत. त्यांनी या सर्व घटनाक्रमावर मौन बाळगले आहे. त्यामुळे ही त्यांची रणनीती आहे की भारतीय सैन्याच्या ताकदीपुढे शरणागती आहे याविषयी चर्चा होत आहे.२२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे सकाळी पिकनिकचा आनंद घेणाऱ्या पर्यटकांवर पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी गोळीबार केल्याने २६ पर्यटकांचा हकनाक बळी गेला. या हल्ल्यानंतर पाकिस्तानला धडा शिकवायच्या तयारीत भारत होता. परंतू भारताने संपूर्ण पाकिस्तानला सावध करुन हा हल्ला केल्याने या हल्ल्याने युद्ध रणनितीकारक चकीत झाले आहेत. या हल्ल्याला ऑपरेशन सिंधुर हे नावही समर्पक देण्यात आले आहे.या हल्ल्यानंतर पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी युद्धाची सुरुवात म्हटले आहे आणि जबाबी कारवाई करण्याची दर्पोक्ती केली आहे.

## पाकिस्तानच्या सियालकोटमध्ये इमर्जन्सी सायरन, पळापळ, भारतीय सैन्याचा जोरदार प्रहार

भारताच्या ऑपरेशन सदिूरनंतर पाकसि्तानी सैन्य पार हडबडून गेल्याच स्पष्ट दसितय. LOC ला लागून असलेल्या गावांमध्ये पाकसि्तानकडून मोठ्या प्रमाणात गोळीबार, तोफगोळ्यांचा मारा सुरु आहे. पाकसि्तानच्या या नापाक कृतीला भारतीय सैन्याकडून चोख प्रत्युत्तर दलिं जात आहे. सैन्याच्या या कारवाईने पाकसि्तानच्या अडचणी वाढल्या आहेत. सयिालकोटच्या बाजवत सेक्टरमध्ये सीमेला लागून असलेल्या गावांमधून लोकांना बाहेर काढण्याच काम पाकसि्तानी सैन्याने सुरु केलं आहे. सयिालकोटमध्ये नुसती पळापळ सुरु आहे. तथि गोंधळाची स्थतिी आहे. संपूर्ण शहरात इमर्जन्सीचे सायरन वाजवले आहेत. माईकवरुन सतत घोषणा केल्या जात आहेत. पाकसि्तानी सैन्याने नागरकिांना सुरक्षति स्थळी जाण्याचं अपील केलं आहे.

## भारत स्वत:हून छेड काढणार नाही, दुसऱ्याने काढली तर..; ऑपरेशन सिंदूरनंतर अण्णा हजारेंची पहिली प्रतिक्रिया

भारतीय लष्कराने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील (पीओके) 9 दहशतवादी तळांवर हवाई हल्ला केला. या एअर-स्ट्राइकचं देशभरातून कौतुक केलं जात आहे. जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनीदेखील 'ऑपरेशन सिंदूर'वर प्रतिक्रिया दिली आहे. "भारत स्वतःहून कोणाची छेड काढत नाही, मात्र कोणी केलं तर सोडायचं नाही. ही कारवाई योग्य आहे," असं अण्णांनी म्हटलं आहे. पहलगाम हल्ल्याच्या 14 दिवसांनंतर भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील (PoK) नऊ दहशतवादी तळांवर एअर स्ट्राइक केला. मध्यरात्री 1.05 ते 1.30 वाजताच्या दरम्यान झालेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये लष्कर-ए-तैयबा आणि जैश-ए-मुहम्मदच्या मुख्यालयांना लक्ष्य करण्यात आलं. काय म्हणाले अण्णा हजारे? "भारतीय लष्कराने केलेल्या कामाचं कौतुक शब्दांत करता येणार नाही. इतकं सुंदर काम लष्कराने केलंय. भारत स्वतःहून कोणाची छेड काढणार नाही. मात्र दुसऱ्याने छेड काढली तर सोडायचं



नाही. त्यामुळे ऑपरेशन सिंदूरची ही कारवाई योग्यच आहे. काही कारण नसताना आपले 26 लोक मारले गेले. त्याचाच सूड भारताने घेतला आहे. त्यामुळे कोणी काही बोलू शकत नाही. अशा प्रकारे कारवाई केल्याने आता कुणाचीही हिंमत होणार नाही," अशी प्रतिक्रिया अण्णा हजारे यांनी दिली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील पीडितांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी भारतीय सशस्त्र दलांनी 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केल्याची माहिती कर्नल सोफिया कुरेशी यांनी दिली. या ऑपरेशनवर देशभरातून विविध प्रतिक्रिया समोर येत आहेत. अनेक बॉलिवूड सेलिब्रिटींनी भारतीय सैन्याचं कौतुक केलं.

# बच्चू कडू ॲक्शन मोडमध्ये! अजित पवार, पंकजा मुंढे, सजय राठोड यांच्या घरासमोर आंदोलन करणार!

प्रहार पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी सत्ताधारी महायुतीवर कठोर शब्दांत टीका केली. शेतकऱ्यांची कर्जमाफी, काश्मीर हल्ला अशा सर्व विषयांवर त्यांनी भाष्य केलं. अमरावतीमध्ये प्रहार पक्षाचा एक कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात बच्चू कडू यांच्या हस्ते प्रहारचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना संताजी आणि धनाजी पुरस्कार देण्यात आला. याच कार्यक्रमात बच्चू कडू बोलत होते. संघटना कशी वाढली पाहिजे यासाठी मी एका टीव्हीवर सिरीयल पाहिली आणि संतांजी धनाजी पुरस्कार कार्यकर्त्यांना दिला पाहिजे, असे मला वाटले. कारण कार्यकर्त्यांशिवाय पक्ष चालूच शकत नाही. त्यामुळे त्यांचा सन्मान करायचं आम्ही ठरवलं, अशी माहिती कडू यांनी दिली. तीन बंदरासारखी व्यवस्था... "गिरता वही है जो रुकता है. बच्चू कडू रुकने वाला नही है. दौडने वाला है. पराभव झाला हे डोक्यातून काढून टाका. अजित पवार म्हणतात सरकारकडे पैसे नाहीत. देवेंद्र फडणवीस हे बोलायला तयार नाहीत. एकनाथ शिंदेंना तर कानच राहलेले नाहीत. तीन बंदरासारखी व्यवस्था निर्माण झाली आहे. एकाचे डोळ्यावर बोट आहे, एकाचे कानावर बोट आहेत आणि एकाचे तोंडावर बोट आहे," अशी टीका बच्चू कडू यांनी केली. मी सांगतो बच्चू कडू धावणारा आहे पडणारा नाही. मतांची चोरी ज्यांनी केली ते चोराची औलाद. भारताची अर्थव्यवस्था ही जगात तिसऱ्या स्थानी आहे पण अजूनही गरिबाला घर नाही. अजितदादाला 55 हजार पगार होता. आज मात्र अजित पवार अडीच लाख रुपये मानधन उचलतात, असाही हल्लाबोल त्यांनी केला. शेतकऱ्यांचा



सातबारा कोरा झाल्याशिवाय... आमदाराला तीन हजार रुपये रोज आणि MRGS मजुराला फक्त 200 रुपये रोजंदारी दिली जाते. निवडणुकीत फडणवीस म्हणाले होते की, शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झाल्याशिवाय राहणार नाही. आता मात्र अजितदादा बोलत नाहीत, फडणवीस तर काहीच बोलायला तयार नाही आणि शिंदें साहेबांना काहीच ऐकायला येत नाही. ह्या तिन्ही बंदरांना काहीच दिसत नाही, ऐकू येत नाही, अशी खोचक टीका बच्चू कडू यांनी केली. ...किमान आता वेळ तरी मिळत आहे 56 इंचापेक्षा आमच्या कार्यकर्त्यांची छाती मोठी आहे. 75 वर्ष काँग्रेसचे गेले आणि 20 वर्षे भाजपाचे गेले. पण अजूनही देशाची अवस्था जशीच्या तशीच आहे. बरं झालं मी निवडणुकीत पडलो, किमान आता वेळ तरी मिळत आहे. बच्चू कडूची ताकत बच्चू कडूमध्ये लपली आहे आमदारकीमध्ये नाही. अजित पवार, पंकजा मुंडे, संजय राठोड यांच्या घरासमोर आम्ही आंदोलन करणार आहोत, असा इशारीही त्यांनी दिला. 15 दिवसांत तारीख नाही सांगितली तर... 5 जूनला आपण मोटारसायकल किंवा गाडीने यवतमाळला ताकतीने जाणार आहोत. तिथून आपण नागपुरात जाऊन देवेंद्र फडणवीस यांच्या घरासमोर जाणार आहोत. पालकमंत्री बावनकुळे म्हणतात आम्ही कर्जमाफी देऊ पण तारीख सांगत नाहीत. जर 15 दिवसांत तारीख नाही सांगितली तर तुमचे चाक आम्ही अडवू. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे समाधीस्थळ असलेल्या मोझरीला 7 जून पासून मी उपोषणाला बसणार आहे. जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाहीच तोपर्यंत मी त्याठिकाणीच थांबणार आहे, असा थेट इशाराही बच्चू कडू यांनी दिला. जिथे अतिरेक्यांनी हल्ला केला त्याठिकाणी जर आपले दोन-तीन जवान असते तर त्यांचा तिथंच खात्मा झाला असता. जिथं गर्दी होती. त्याठिकाणी सुरक्षा नव्हती. म्हणतात मी चौकीदार आहे. पण यांच्या काळातच सर्वाधिक भ्रष्टाचार झाला आहे, असा गंभीर आरोपही त्यांनी केला.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com